IIP
IIP: WJHSS
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# भारतीय राजकीय विचारवंत आणि सामाजिक परिवर्तन एक विश्लेषणात्मक अभ्यास

**भगवान किसन गिरी, प्रा. डॉ. पी.के. नंडेश्वर**
उत्तमचंद बगडिया कला व वाणिज्य महा. रिसोड ता.रिसोड जि. वाशिम

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
सामाजिक परिवर्तन
राजकीय

**ABSTRACT**

भारताला राजकीय विचारवंतांची मोठी परंपरा लाभलेली आहे भारताच्या भूमीला नवरत्नांची खान म्हणून ओळखले जाते. ते याच राजकीय विचारवंतांच्या कार्यामुळे हे विचारवंत केवळ सत्ता आणि राजकारण याबद्दल बोलले नाहीत तर त्यांनी समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश काळात भारतीय राजकीय विचारवंतांनी आधुनिक भारताच्या विचारधारेचा पाया रचला त्यामध्ये सामाजिक न्याय लोकशाही शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मतेवर भर दिला गेला. तर काही विचारवंतांनी ब्रिटिश धोरणांना आवाहन देत शोषणाविरुद्ध आवाज उठवत वसाहतवादाला विरोध केला आणि भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात राष्ट्र उभारणीत महत्त्वपूर्ण वैचारिक दिशा दिली. ब्रिटिश काळात या विचारवंतांनी केवळ ब्रिटिश राजवटीला विरोध केला नाही तर त्यांनी भारताच्या भविष्यासाठी लोकशाही, धर्मनिरपेक्ष सामाजिक समानता आणि राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित एक मजबूत वैचारिक पाया रचला की, ज्यामुळे अनेक महत्त्वाचे सामाजिक बदल घडून आले. त्यांचे विचार आजही भारतीय आणि सामाजिक जीवनासाठी प्रेरणास्थान आहेत. करिता, प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Giri, B. K., & Nandeshwar, P. K. (2025). भारतीय राजकीय विचारवंत आणि सामाजिक परिवर्तन: एक विश्लेषणात्मक अभ्यास. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), 201–207.

**प्रस्तावना :** भारताला राजकीय विचारवंतांची मोठी परंपरा लाभलेली आहे भारताच्या भूमीला नवरत्नांची खान म्हणून ओळखले जाते. ते याच राजकीय विचारवंतांच्या कार्यामुळे हे विचारवंत केवळ सत्ता आणि राजकारण याबद्दल बोलले नाहीत तर त्यांनी समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश काळात भारतीय राजकीय विचारवंतांनी आधुनिक भारताच्या विचारधारेचा पाया रचला त्यामध्ये सामाजिक न्याय लोकशाही शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मतेवर भर दिला गेला. तर काही विचारवंतांनी ब्रिटिश धोरणांना आवाहन देत शोषणाविरुद्ध आवाज उठवत वसाहतवादाला विरोध केला आणि भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात राष्ट्र उभारणीत महत्त्वपूर्ण वैचारिक दिशा दिली. ब्रिटिश काळात या विचारवंतांनी केवळ ब्रिटिश राजवटीला विरोध केला नाही तर त्यांनी भारताच्या भविष्यासाठी लोकशाही, धर्मनिरपेक्ष सामाजिक समानता आणि राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित एक मजबूत वैचारिक पाया रचला की, ज्यामुळे अनेक महत्त्वाचे सामाजिक बदल घडून आले. त्यांचे विचार आजही भारतीय आणि सामाजिक जीवनासाठी प्रेरणास्थान आहेत. करिता, प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

भारतीय उपखंडाचा इतिहास हा राजकीय विचार आणि सामाजिक बदलांच्या गुंतागुंतीच्या संबंधांनी भरलेला आहे. प्राचीन काळातील कौटिल्य पासून ते आधुनिक काळातील महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंतच्या विचारवंतांनी समाजाला दिशा देण्यासाठी आणि विषमतेवर मात करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. प्रस्तुत संशोधन विषयांमध्ये भारतीय राजकीय विचारवंतांच्या विचारांचा सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात अभ्यास करण्यावर भर दिलेला आहे. विशेषतः भारतीय राजकीय विचारवंतांनी जाती आधारित विषमतेवर कसा हल्ला केला आणि एक नाट्यपूर्ण समतावादी समाजाची स्थापना कशी केली याचा प्रस्तुत संशोधन विषयात सखोल अभ्यास केला आहे.

भारतीय राजकीय विचारवंतामुळे भारतीय समाजात अमुलाग्र बदल घडले ज्याने जातिव्यवस्थेला आव्हान दिले. महिला सक्षमीकरण केले आणि राष्ट्र निर्मितीचा पाया रचला. ज्यामुळे समाज अधिक समावेशक व आधुनिक बनण्यास मदत झाली या विचारवंतांनी भारतीय समाजाला अंधश्रद्धा, विषमता आणि जाचक अशा जोखडातून बाहेर काढून आधुनिक न्यायपूर्ण आणि लोकशाही मूल्यांवर आधारित समाजरचनेकडे नेले. ज्यामुळे भारताच्या राजकीय आणि सामाजिक जडणघडणीत मोठे परिवर्तन झाले. एकूणच भारतीय राजकीय विचारवंतांच्या विचारांमधून आधुनिक भारताच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक जडणघडणीचा अभ्यास करण्यासाठी तसेच सामाजिक सुधारणांच्या प्रेरणा आणि आव्हानांचे विश्लेषण करून वर्तमान आणि भविष्यातील धोरणासाठी दिशा देतात. त्यामुळे भारतीय समाजातील बदलांची प्रक्रिया समजून घेण्यासाठी मदत होईल. यासाठीच प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) प्रमुख भारतीय विचारवंतांच्या राजकीय विचारांचा सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात अभ्यास करणे.

२) विचारवंतांच्या विचारांचा समाजावर झालेला परिणाम तपासणे, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी या विचारवंतांनी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.

३) भारतीय विचारवंतांनी मांडलेल्या विचारांचा भारतीय समाजातील बदलांवर झालेला परिणाम अभ्यासणे.

४) सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी या विचारवंतांनी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.

**गृहीतके** :

१) भारतीय राजकीय विचारवंतांनी सामाजिक परिवर्तनातून जागरूकता, समता आणि न्याय प्रस्थापित केला.

२) विचारवंतांच्या विचारामुळे स्वातंत्रोत्तर काळात खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण झाले.

३) भारतीय राजकीय विचारवंतांनी उदारमतवाद, लोकशाही आणि घटनावादाच्या विचारांना प्रोत्साहन दिले.

४) विचारवंतांकडून रूढीवादी विचारांना आव्हान दिले गेले.

**तथ्य संकलन व संशोधन पद्धती.**

प्रस्तुत शोध निबंधकरिता वर्णनात्मक अन्वेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला असून तथ्य संकलनाकरिता दुय्यम साधनांचा वापर केला गेला आहे. या दुय्यम साधनांमध्ये त्यांच्या काळातील वृत्तपत्रातील लेख, संदर्भग्रंथ, शोधनिबंध, मासिके, राजकीय विचारवंतांची माहिती मिळणारी संकेतस्थळे यावरील माहिती ही सत्य संकलनाकरिता वापरात आणली आहे.

**संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा.**

प्रस्तुत संशोधन विषयात ब्रिटिशकालीन सामाजिक सुधारणा चळवळी आणि त्यांच्या राजकीय विचारांचा व सामाजिक बदलांमध्ये राजकीय विचारवंतांच्या प्रभावाचा अभ्यास केला जाईल.तसेच प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती भारतीय राजकीय विचारधारेचा प्रवास आणि सामाजिक परिवर्तन यावर त्याचा परिणाम या विषयांवर केंद्रित असेल. ज्यामध्ये सिद्धांतिक आणि व्यावहारिक दोन्ही पैलूंचा समावेश असेल. तसेच अभ्यासामध्ये प्राचीन किंवा मध्ययुगीन विचारवंतांचा समावेश नसून 19 व्या ते 20 व्या शतकातील विचारवंतांचा समावेश राहील.

**भारतातील काही प्रमुख राजकीय विचारवंत खालील प्रमाणे आहेत.**

1) **राजा राममोहन रॉय.**

राजा राममोहन रॉय हे आधुनिक भारताचे जनक मानले जातात ज्यांनी सामाजिक सुधारणा आणि उदारमतवादी विचारांची मुहूर्तमेढ रोवली. राजा राममोहन रॉय यांनी सर्वधर्माचा अभ्यास केल्यानंतर समाजाचा उत्कर्ष व्हावा आणि सर्वांचे कल्याण, मानवता, बंधुता तसेच एकेश्वर वादावर विश्वास ठेवून 20 ऑगस्ट 1820 रोजी ब्राम्हो समाजाची स्थापना केली. राजा राममोहन रॉय यांचे समाजसुधारणा क्षेत्रातील कार्य आणि शैक्षणिक कार्य महत्त्वाचे आहे. समाजातील अंधश्रद्धा प्रतिगामी चालीरीती, कर्मकांडांचा निषेध आणि सर्व धर्मातील समानता, मूर्तिपूजेस नकार, एकेश्वर मताचे खंडन आणि सामाजिक सुधारणा हे कार्य महत्त्वाचे मानले जाते.

2) **स्वामी दयानंद सरस्वती.**

भारतामध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांचे स्थान अग्रगण्य आहे. त्यांनी हिंदू समाजाची सर्वांगीण उन्नती व्हावी, वैदिक धर्म आणि वैदिक संस्कृतीचे पुनरुज्जीवन व्हावे या उद्देशाने 10 एप्रिल 1875 रोजी आर्य समाजाची स्थापना केली. आर्य समाज सभासदांनी राष्ट्रीय आंदोलनातही महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्रीय जागृती हे आर्य समाजाचे उद्दिष्ट मानले होते. तसेच उत्तर भारतात शैक्षणिक संस्थांची उभारणी केली. आर्य विद्यालये, दयानंद अँग्लोवैदिक महाविद्यालय सुरू केली. त्यातून समाजातील सर्व घटकांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. तसेच जातीभेद निर्मूलन, बालविवाह, विधवांची समस्या यासंबंधी केलेली लोक जागृती महत्त्वाची आहे.

3) **महात्मा ज्योतिराव फुले.**

महात्मा फुले यांचे राजकीय विचार हे समानता, न्याय आणि लोकशाही या मूल्यांवर आधारित होते. ज्यात समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यावर त्यांचा भर होता. त्यांचे राजकीय विचार हे त्यांच्या सामाजिक सुधारणा वादास पूरक होते. स्त्रियांना ज्ञानार्जनासाठी घराबाहेर पडू देणारे आणि चाकोरी मुक्त करणारे फुले हे पहिले भारतीय विचारवंत होते. त्यासाठीच त्यांनी सण 1848 मध्ये मुलींची पहिली शाळा पुणे येथे काढली. त्यांनी केवळ पुस्तकी तत्त्वज्ञान मानले नाही तर, अनेक समस्यांना हात घातला आणि स्वतः त्याच्यावर काम केले. म्हणूनच त्यांना भारतीय सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हटले जाते.

4) **राजश्री शाहू महाराज.**

छत्रपती शाहू महाराजांचे राजकीय कार्य हे सामाजिक समानता, शिक्षण आणि दलितांच्या हक्कासाठी होते. ज्यामध्ये त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. 1917 मध्ये जातीभेद नष्ट करण्यासाठी आदेश काढले. विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता निवारण कायद्यांना पाठिंबा दिला आणि शेती व पाणी व्यवस्थापनात

सुधारणा घडवून आणल्या. ते महात्मा फुलेंची सच्चे वारसदार होते. ज्यामुळे कोल्हापूर संस्थानाला देशभर लौकिक मिळाला. शाहू महाराजांनी चातुरवर्ण व्यवस्था व जातीभेदाविरुद्ध झुंज दिली. त्यांना अस्पृश्य शब्द अमान्य होता. अस्पृश्यांनी शिकावे म्हणून त्यांनी वस्तीगृह काढली. स्वतंत्र शाळा काढली तसेच भटक्या जमातीसाठी उल्लेखनीय कार्य केले. शाहू महाराजांनी बालविवाहावर बंदी आणली. 1917 साली विधवा पुनर्विवाह कायदा केला. सर्वांसाठी सारखे शिक्षण या तत्त्वानुसार त्यांनी स्त्री शिक्षणाचा ही पुरस्कार केला. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य अद्वितीय होते. उपेक्षितांना विशेष मदत केल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही हे त्यांना माहीत होते. एकूणच शाहू महाराजांनी सामाजिक न्याय, शिक्षण आणि लोककल्याण या मूल्यांवर आधारित राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे ते लोक कल्याणकारी राजा म्हणून ओळखले जातात.

5) **महर्षी धोंडो केशव कर्वे.**

महर्षी धोंडो केशव कर्वे म्हणजे स्त्री शिक्षण आणि स्त्रियांची उन्नती हे समीकरण फक्त महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात मान्यता पावले आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक सुधारणा आणि स्त्री शिक्षणासाठी वेचले. या त्यांच्या अलौकिक कार्याचा सन्मान म्हणून भारत सरकारने “भारतरत्न” या सर्वोच्च पदवीने त्यांचा गौरव केला आहे. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे राजकीय कार्य सामाजिक सुधारणांद्वारे समाज आणि राष्ट्र घडवण्यावर केंद्रित होते. ज्यात महिला शिक्षण (एस.एन.डी.टी. विद्यापीठाची स्थापना) विधवा पुनर्विवाह, जातीव्यवस्थेचा विरोध आणि ग्रामीण शिक्षणाला प्रोत्साहन यासारख्या कार्याचा समावेश होतो. त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून आणि संस्थांच्या उभारणीतून ब्रिटिश राजवटीत सामाजिक क्रांती घडवली आणि देशाला दिशा दिली.

6) **लोकमान्य टिळक.**

लोकमान्य टिळकांचे राजकीय विचार भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण होते. त्यांनी स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार या चतुसूत्रीवर आधारित आक्रमक राष्ट्रवादी धोरणाचा त्यांनी पुरस्कार केला. टिळक हे जहाल गटाचे नेते मानले जात. ते आक्रमक वृत्तीचे होते आणि सरकारला थेट भिडण्याची त्यांची तयारी होती. मवाळ नेत्यांच्या याचिका आणि अर्ज करण्याच्या नितीवर त्यांचा विश्वास नव्हता. टिळकांनी धर्म आणि व्यवहारिक जीवन वेगळे नसल्याचे सांगितले. केवळ स्वतःसाठी काम न करता देशाला आपले कुटुंब मानने हाच खरा धर्म आहे असे त्यांचे मत होते. त्यांनी गणेशोत्सव आणि शिवजयंती यासारख्या उत्सवांना सार्वजनिक स्वरूप दिले. ज्यामुळे लोकांना एकत्र आणता आले आणि राष्ट्रीय चळवळीला बळ मिळाले.

लोकमान्य टिळकांनी आपल्या लेखनातून, भाषणातून आणि केसरी व मराठा या वृत्तपत्रातून आपल्या राजकीय विचारांचा सातत्याने प्रसार केला. ज्यामुळे ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पहिले जननेते बनले. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना “भारतीय असंतोषाचे जनक” म्हटले होते.

7) **महात्मा गांधी.**

महात्मा गांधींचे राजकीय विचार म्हणजे सत्य, अहिंसा, स्वराज्य आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर आधारित होते. ज्यात “हिंद स्वराज्य” सारख्या विचारातून पाश्चात्य सभ्यतेवर टीका करून नैतिक आणि अध्यात्मिक तत्त्वावर आधारित स्वतंत्र भारताची कल्पना मांडली. त्यांनी अहिंसक आंदोलनाचा वापर करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. आणि त्यांचे विचार जगभरातील नागरी हक्क चळवळीसाठी प्रेरणास्त्रोत ठरले. ज्यामध्ये धर्मनिरपेक्षता, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री स्वतंत्र्याला महत्त्व दिले. गांधींजीनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्त्वाचा पुरस्कार केला. स्वतः देखील याच तत्वानुसार जगले आणि इतरांनाही तसे करावे असे सुचवले. त्यांनी खेड्यांना खऱ्या भारताचे मूळ म्हणून पाहिले. जेव्हा व्यक्तीचा नैतिक विकास पूर्ण होऊन अहिंसेच्या आधारावर समाजरचना निर्माण होईल तेव्हा राज्याची आवश्यकता राहणार नाही. नैतिकता आणि सदवर्तन हा जेव्हा समाजाचा आधार असतो तेव्हा दंड देणाऱ्या सत्तेचा वापर करणाऱ्या राज्याची आवश्यकता नसते. गांधीजींचे कार्य केवळ राजकीय

नसून सामाजिक न्याय आणि मानवतेसाठीच होते ज्यामुळे ते जगभरात प्रेरणास्थान बनले. गांधीजींचे राजकीय विचार हे नैतिक, आध्यात्मिक आणि मानवी मूल्यांवर आधारित एक सर्वसमावेशक समाजाची निर्मिती करण्यावर केंद्रित होते. जिथे सत्य, अहिंसा आणि समानता केंद्रस्थानी असतील. गांधीजींकडून सत्य, अहिंसा, सत्याग्रह हे विचार केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगाला मिळालेली देणगी आहे.

8) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर.**

आधुनिक भारतातील युगपुरुष म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करावा लागेल. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ते विख्यात आहेत. परंतु त्याचबरोबर कोट्यावधी दलितांच्या जीवनाचे उद्धारक म्हणून ते सदैव ज्ञात राहतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रांतिकारक होते. ते सुधारकाग्रणी होते. ग्रंथाचे पूजक होते. शिक्षणतज्ञ, राजनितीतज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार हे समता, न्याय , बंधुता, लोकशाही, समाजवाद, राष्ट्रवाद आणि अल्पसंख्यांक यांचे हक्क यावर आधारित होते. ज्यात त्यांनी शिक्षण, स्वाभिमान संघटन आणि सामाजिक क्रांतीच्या माध्यमातून दलितांसह सर्व शोषित वर्गाच्या मुक्तीचा मार्ग दाखवला. त्यांचे विचार अतिशय महान व प्रत्येक तरुणांकरिता नेहमी आदर्श राहतील असेच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र वाचल्यानंतर आयुष्य काय असतं आणि संघर्ष कशाला म्हणतात याचे मूर्तीमंत उदाहरण आपल्यासमोर प्रकट होईल. डॉ. आंबेडकरांनी भारतीय विविध राजकीय प्रश्नासंबंधी आणि राजकीय तत्वज्ञानासंबंधीची मते आपल्या अनेक लेखातून, पुस्तकातून आणि भाषणातून मांडली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या विचारांचा तत्कालीन राजकारणावर तसेच स्वातंत्र्याच्या राजकारणावर प्रभाव पडला आहे.

डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार हे एका सर्वसमावेशक समतावादी आणि लोकशाही भारताच्या निर्मितीसाठी होते. जिथे जात, धर्म, लिंग यावर आधारित भेदभाव नसेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अविस्मरणीय आहे.

9) **स्वातंत्र्यवीर सावरकर.**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे राजकीय विचार हे राष्ट्रवाद, हिंदुत्व, सामर्थ्यशाली राष्ट्र, समाजसुधारणा आणि राष्ट्र निर्मिती यावर आधारित होते. ज्यात भारताच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक आणि लष्करी सामर्थ्य, हिंदू समाजात एक्य, सामाजिक सुधारणा, भाषाशुद्धी आणि हिंदुत्व या संकल्पनेवर आधारित एक मजबूत राष्ट्र उभारणी यावर भर होता. तसेच त्यांनी परंपरेतील चांगल्या गोष्टीचा अभिमान बाळगून अज्ञानाचा त्याग करण्याचा विचार मांडला. सावरकरांनी हिंदुत्व या संकल्पनेचा विकास केला. ज्यामधे केवळ धार्मिक नसून सिंधू नदीपासून समुद्रापर्यंतच्या भूमीला हिंदू राष्ट्र मानले गेले. यामध्ये सर्व भारतीयांना सामावून घेण्याचा दृष्टिकोन होता. तसेच जातिभेद, अस्पृश्यता यासारख्या कुप्रथांना विरोध करून त्यांनी सामाजिक एक्यावर भर दिला. जाती-धर्माच्या पलीकडे एक राष्ट्र ही त्यांची भूमिका होती. थोडक्यात सावरकरांचे विचार हे राष्ट्र प्रथम या भावनेतून प्रेरित होते. ज्यामध्ये राष्ट्रभक्ती, सामर्थ्य, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक अस्मिता यांचा समन्वय होता.

**10) पंडित जवाहरलाल नेहरू.**

भारतातील एक दूरदर्शी नेते आणि राजकीय विचारवंत अशी पंडित नेहरू यांची ओळख आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे राजकीय विचार लोकशाही, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता, विज्ञान आणि अहिंसक परराष्ट्र धोरण यावर आधारित होते. ज्यांनी आधुनिक भारताचा पाया रचला जिथे, त्यांनी सर्वसामान्या जनतेला केंद्रस्थानी ठेवून लोकशाही समाजवादाद्वारे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासावर भर दिला. तसेच जागतिक स्तरावर भारताला एक स्वतंत्र आणि शांतताप्रिय स्थान मिळवून दिले. एकूणच पंडित नेहरू हे एक दूरदर्शी नेते होते. ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यानंतर देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले. त्यांचे विचार भारतीय राजकारणाचा आणि विकासाचा आधारस्तंभ ठरले आहेत. म्हणूनच ते आधुनिक भारताचे शिल्पकार मानले

जातात.

1947 मध्ये भारताच्या स्वातंत्र्यानंतर त्यांनी सोळा वर्षे देशाचे पहिले पंतप्रधान म्हणून कार्य केले. या कार्यामध्ये सर्वात उल्लेखनीय कार्य म्हणजे आधुनिक समाजवादी आणि लोकशाही भारताचा पाया रचला ज्यामधे त्यांनी पंचशील, नियोजन आयोग, (निती आयोग) मोठी धरणे, आय.आय.टी. एस. आणि ए.आय. आय. एम. एस. यासारख्या संस्थांची स्थापना केली. आणि अलिप्तवादी चळवळीचे नेतृत्व यासारख्या दूरदृष्टीच्या धोरणांद्वारे भारताला विकासाच्या मार्गावर आणले आणि जागतिक स्तरावर एक स्वतंत्र ओळख दिली.

**भारतातील प्रमुख विचारवंतांच्या राजकीय विचारांमुळे झालेले सामाजिक परिवर्तन**.

भारतीय राजकीय विचारवंतांच्या विचारामुळे समाजात शिक्षण, सामाजिक न्याय, समता आणि मानव अधिकार यासारख्या मूल्यांचा प्रसार झाला. त्यामुळे जातीयवाद, अस्पृश्यता, सतीप्रथा यासारख्या सामाजिक कुप्रथांवर प्रहार झाला. राजा राममोहन रॉय यांनी सतीबंदीसाठी केलेली चळवळ आणि 1829 चा कायदा मौलिक आहे. आजही सती जाण्याची अपवादात्मक घटना घडते तेव्हा राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या प्रयत्नांची, चळवळीची आठवण येते. तसेच त्यांच्या विचारांनी महत्त्वपूर्ण बदलांना चालना दिली तसेच त्यांनी तर्कशुद्ध विचार आणि कर्मकांडांना विरोध केल्यामुळे हिंदू धर्मात सुधारणा झाली. स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाने प्रभावित होऊन आजही सर्व देशात प्राधान्याने पंजाब आणि उत्तर प्रदेशात आर्य समाजाचे समाज सुधारण्याचे कार्य संपन्न होत आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात समानता, तर्कशुद्ध विचार, स्त्री सक्षमीकरण आणि राष्ट्रवाद या मूल्यांची रुजवात झाली ज्यामुळे आधुनिक भारताच्या निर्मितीला बळ मिळाले.

महात्मा फुले यांच्या राजकीय विचारांमुळे समाजात जातिव्यवस्थेला आव्हान, स्त्री शिक्षणास प्रोत्साहन, शेतकरी शोषितांच्या हक्कांसाठी जागृती आणि सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून तर्कशुद्ध विचारांचा प्रसार झाला. ज्यामुळे सामाजिक समानता आणि न्यायाची पायाभरणी, बहुजन समाजाच्या राजकीय व सामाजिक हक्कांसाठी मोठी चळवळ उभी राहिली. त्यांच्या विचारांमुळे भारतातील सामाजिक न्याय, चळवळीला प्रेरणा मिळाली. त्यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले ज्यामुळे सामाजिक रूढींना आव्हान मिळाले. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांवर आवाज उठवला आणि त्यांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यास प्रवृत्ती केले. त्यामुळे शेतीविषयक धोरणावर परिणाम झाला. एकूणच महात्मा फुलेच्या राजकीय विचारांनी तत्कालीन समाजाला जातीभेदमुक्त, शिक्षित आणि समताधिष्ठित समाज निर्माण करण्याची दिशा दिली. ज्याचा प्रभाव आजही भारतीय समाज आणि राजकारणावर दिसतो. छत्रपती शाहू महाराजांच्या राजकीय विचारांमुळे समाजात शिक्षण, नोकरी आणि सामाजिक समानतेच्या क्षेत्रात मोठे बदल झाले. जात आरक्षणाची सुरुवात, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन आणि विधवा पुनर्विवाह व देवदासी प्रथा बंदी यासारख्या सुधारणा झाल्या. त्यांनी जातीभेद विसरून सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून जातीनिहाय वस्तीगृहे सुरू केली. त्यामुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाला ज्ञानाचे दरवाजे उघडले गेले. एकूणच शाहू महाराजांच्या विचारांनी केवळ राजकीय बदल घडवले नाहीत तर शिक्षणातून व कायद्यातून समाजाच्या प्रत्येक स्तरावर क्रांतिकारक बदल घडवून आणले. ज्यामुळे एक समताधिष्ठित आणि प्रगल्भ समाजाची निर्मिती झाली. भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या विचारांनी विधवा पुनर्विवाह आणि स्त्री शिक्षणाला चालना दिली ज्यामुळे स्त्रियांच्या हक्कांसाठी सामाजिक क्रांती घडली. त्यांनी स्वतः एका विधवेशी विवाह करून आणि विधवा मुलींसाठी शाळा उघडून समाजात कृतीतून बदल घडवला. त्यांच्या या कार्यामुळे विधवा पुनर्विवाह सुरू झाला. महर्षी कर्वे यांनी स्त्रियांच्या शिक्षणाचे आणि हक्कांचे दरवाजे उघडून समाजात एक मोठे सामाजिक आणि राजकीय परिवर्तन घडवून आणले. ज्यामुळे स्त्रियांचा समाजातील दर्जा उंचावला तर लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांमुळे जनसामान्यांचा स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग वाढला आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा मिळाली. नवे राजकीय सामाजिक विचार

रुजले असे म्हणता येईल. परंतु सर्वात प्रभावी बदल म्हणून सामाजिक सुधारणा, उपेक्षितांची प्रगती आणि लोकशाही मूल्यांची रुजवणूक झाली.

**समारोप.**

भारतातील राजकीय विचारवंतांच्या विचारांमुळे समाजात लोकशाहीकरण आधुनिकीकरण, सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षता यासारखे मोठे बदल झाले आहेत. ज्यामध्ये मतदानाचा हक्क, आरक्षणासारखे कायदे, जातिव्यवस्थेतील बदल आणि प्रादेशिक पक्षांचा उदय यांचा समावेश आहे.

**संदर्भ ग्रंथ.**

१. आगलावे प्रदीप, ‘‘सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे’’ श्री साईनाथ प्रकाशन २००८ नागपूर

२. प्रा.शेख हाशम, प्रा. कमलाकर देशमुख, प्रा अरविंद पाटील ‘‘भारतीय आणि पाश्चिमात्य विचारवंत’’ विश्व प्रकाशन, नागपूर

३. विद्युत चक्रवती, राजेंद्रकुमार पांडे ‘‘आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत’’ डायमंड प्रकाशन शनिवार पेठ पुणे

४. डॉ.भा.ल.भोळे ‘‘ राजकीय सिद्धांत’’ पिंपाळापुरे प्रकाशन, नागपूर.

**संकेतस्थळे :**

1. Amezon.in.pragationline.com
2. Bookganga.com
3. Prashantpublications.com
4. Ndl.education.gov.in